|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

जळगाव दि. २६ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे इनोव्हेशन, इनक्युबेशन व लिंकेजेस केंद्र आणि नंदुरबार येथील डॉ. हेडगेवार सेवा समितीचे कृषी विज्ञान केंद्र यांच्यात कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी यांच्या उपस्थितीत सामजंस्य करार करण्यात आला.

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण सप्ताह अंतर्गत हा सामजंस्य करार करण्यात आला आहे. नंदुरबार येथील कृषी विज्ञान केंद्र यांचे कृषी क्षेत्रात व संशोधन क्षेत्रात उल्लेखनीय काम आहे तर विद्यापीठातील केसीआयआयएल केंद्राच्यावतीने नवउद्योजक घडविण्याचे काम केले जात आहे. या सामजंस्य करारामुळे कृषी क्षेत्रात नवीन उद्योजक संस्कृती रूजविण्यावर भर देण्यात आला आहे. त्याप्रमाणे नवनवीन तंत्रज्ञान, ज्ञान आणि नवोपक्रमावर आधारित स्टार्टअॅपला प्रोत्साहन दिले जाणार आहे. इतर संस्था अथवा उद्योजकांनी नाविण्यपूर्ण विकसित केलेल्या तंत्रज्ञानाचा व्यावसायिकतेसाठी व्यासपीठ उपलब्ध करून दिले जाईल. शैक्षणिक संस्था, वित्तीय संस्था, उद्योग आणि इतर संस्था यांच्यात स्टार्टअॅपसाठी नेटवर्क स्थापन करून दिले जाणार आहे. यासोबतच विद्यार्थ्यांचे संवाद कौशल्य आणि व्यक्तिमत्व विकसित करणे, आत्मविश्वास वाढविणे, उद्योजकतेसाठी आवश्यक असलेले नेतृत्व निर्माण करणे या प्रकारचे उद्देश या सामजंस्य करारामध्ये नमूद करण्यात आले आहेत. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाला अभिप्रेत असलेली इंटर्नशिप देखील विद्यार्थ्यांना या सामजंस्य करारामूळे उपलब्ध होणार आहे. या कराराप्रसंगी केसीआयआयएलचे संचालक डॉ. राजेश जवळेकर, डॉ. भूषण चौधरी, कृषी विज्ञान केंद्राचे ट्रस्टी व अधिसभा सदस्य केदारनाथ कवडीवाले, विषयतज्ज्ञ व अधिसभा सदस्य जयंत उत्तरवार आणि कृषी विज्ञान केंद्राचे वरिष्ठ वैज्ञानिक व प्रमुख राजेंद्र दहातोंडे उपस्थित होते.

---

जा.क्र.: कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२३ दिनांक: २६ जुलै, २०२३

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)

जनसंपर्क अधिकारी